**Special Case Study :- Dr Ravinder Singh Rao, Interventional Cardiologist**

Lilavati Hospital Doctors Save Life of 78-Year-Old Woman with Serious Heart Disease

सकाळ

# हृदयरोग पीडित महिलेवर यशस्वीरीत्या उपचार

## देशातील पहिली ट्रान्सकॅथेटर शस्त्रक्रिया

मुंबई, ता. २४ : लीलावती रुग्णालयाने मिट्रल एन्युलर कॅल्सिफिकेशन या गंभीर हृदयरोगाने पीडित एका ७८ वर्षीय महिलेवर यशस्वीरीत्या उपचार करून तिला नवे जीवन दिले. ट्रान्सकॅथेटर ट्रान्सएट्रियल मिट्रल व्हॉल्व्ह रिप्लेसमेंट शस्त्रक्रियेद्वारे रुग्णावर उपचार करण्यात आले असून, भारतातील ही पहिली यशस्वी ट्रान्सएट्रियल शस्त्रक्रिया ठरली आहे.

इंटरव्हेन्शनल स्ट्रक्चरल कार्डिओलॉजिस्ट डॉ. रवींदर सिंग राव, कार्डियाक सर्जन डॉ. कौशल पांडे आणि कार्डियाक अॅनिस्थेसिसिस्ट डॉ. उदय गांधी यांच्या नेतृत्वाखालील टीमने प्रसंगावधान राखत या रुग्णावर यशस्वी शस्त्रक्रिया केली. रुग्ण सुजाता सकपाळ (नाव बदलले) यांना गेल्या काही महिन्यांपासून श्वास घेण्यास त्रास होत होता. त्यांना झोप येत नव्हती आणि जेवताना, चालताना किंवा अंघोळ करतानाही त्रास होत होता. या सर्व त्रासाला कंटाळून अनेक डॉक्टरांकडून उपचार घेतल्यानंतरही काहीच सुधारणा झाली नाही.

डॉ. रवींदर सिंग राव सांगतात, की रुग्ण महिलेचे वय आणि नाजूक शारीरिक स्थिती बघून आम्ही ट्रान्सकॅथेटर ट्रान्सएट्रियल मिट्रल व्हॉल्व्ह रिप्लेसमेंट तंत्र निवडले. खराब झालेले व्हॉल्व्ह काढून नवीन इम्प्लांट करण्यासाठी हृदयात एक छोटासे छिद्र पाडण्यात आले. रुग्णाला फक्त एका दिवसासाठी आयसीयूमध्ये ठेवण्यात आले आणि तिच्या प्रकृतीत सुधारणा झाल्यानंतर चार दिवसांत तिला घरीदेखील सोडण्यात आले. तीन महिन्यांनंतर ती आता पुन्हा चालू शकते, पुरेशी झोप घेऊ शकते आणि श्वासोच्छ्वासाच्या कोणत्याही समस्येशिवाय स्वतंत्रपणे जगू शकते.



### मिट्रल झडपेची दुरुस्ती

वैद्यकीय चाचण्या केल्यानंतर त्यांच्या मायट्रल व्हॉल्व्हचे नुकसान झाल्याचे दिसून आले. तिचे वय, फुफ्फुसांची स्थिती आणि तिच्या हृदयासंबंधी गुंतागुंत पाहता ट्रान्सकॅथेटर मिट्रल वाल्व्ह रिप्लेसमेंट ही एक प्रक्रिया करण्याचा निर्णय घेण्यात आला. यामध्ये ओपन हार्ट सर्जरी न करता हृदयाच्या मिट्रल झडपेची दुरुस्ती किंवा बदल करण्यासाठी कॅथेटरचा वापर केला जातो.